**सं.फौ. खं. क्र. ६४९/२०२०** **रामभाऊ वि. श्रावण**

**नि. ३३ खाली**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षिदार क्र.१ रामभाऊ तुकाराम आगरे यांचा पुढील सरतपार फिर्यादी तर्फे वकील श्री. एन.के.हाजरे यांचेकडून शपथेवर सुरु</u>**

मी पुराव्यातील शपथपत्रातील सर्व मजकूर वाचून समजून घेवून त्यावर सही केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आता मला यादी नि.क्र.३२/०१ कडील धनादेश दाखविला. तो स्टेट बँक ऑफ इंडीयाचा असून तो मला आरोपीने दिलेला आहे. धनादेशावरील सही आरोपीची आहे. त्यातील मजकूर व रक्कम माझ्या मुलाने लिहीला आहे. त्यास **<u>नि.क्र.३७</u>** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२/०२ कडील रिटन मेमो दाखविला. त्यावर बँकेचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.३८</u>** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२/०३ कडील करार दाखविला. आरोपीने माझ्याकडून पैसे घेतले होते म्हणून सदरचा कागद मी व माझ्या मुलाने तयार करून घेतला आहे. त्यातील मजकूर माझ्या मुलाने लिहीला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. शिवकुमार आगरे व नरेंद्र आगरे यांच्या साक्षिदार म्हणून सह्या आहेत. त्यास **<u>नि.क्र.३९</u>** देण्यात येते. सदर कागदपत्रास निशानी देण्यास आरोपीच्या वकीलांनी हरकत नोंदविली. आता मला ३२/०४ कडील नोटीस दाखविली. ती मी वकीलांमार्फत पाठविली होती. त्यावर वकीलांची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.४०</u>** देण्यात येते. आता मला ३२/०५ कडील पोस्टल रिसीप्ट दाखविली. त्यास **<u>नि.क्र.४१</u>** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वाक्षरी /-

ठिकाण –कामठी **(सागर एस. जाधव)**

**दिनांक – ०६/०३/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**